# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## Assessment -IV

SUB-MARATHI — TIME:-2HRS

STD-V — MARKS:-40

**प्रश्न १-खालील पठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

रांगोळी रेखटण्यासाठी निरनिराळ्या सामग्रीचा उपयोग केला जातो. दक्षिण व उत्तर भारतात प्रमुखत: ओले किंवा सुके तांदुळाचे पीठ रांगोळी काढण्यासाठी वापरतात तर अन्य प्रांतात चुन्याची पावडर व आपल्या महाराष्ट्रात शिरगोळ नावाच्या दगडाच्या भुकटीने रांगोळी काढली जाते. अंगठा व त्या जवळचे बोट ह्याच्या चिमटीत रांगोळी पावडर पकडून रांगोळी काढली जाते. प्रथेनुसार चालत आलेल्या थैंबांच्या रांगोळीमध्ये थैंब किंवा बिंदू एकमेकांशी जोडून निरनिराळे आकार साखर केले जातात .रेषा ,वक्ररेषा ,अर्ध गोल ,गोल ,चौकोन इत्यादींच्या साहयाने रांगोळी काढली जाते .त्यानंतर त्यात नयनरम्य रंग भरून तिला आकर्षक केले जाते .रांगोळीत कुठेही रिकामी जागा ठेवत नाही. रंग भरून पूर्ण करतात.

**क) रिकाम्या जागा भरा.** (१)

१)रांगोळी रेखटण्यासाठी निरनिराळ्या _______ उपयोग केला जातो.

२) रांगोळीत कुठेही _______ जागा ठेवत नाहीत.

**ख)चूक की बरोबर ते लिहा.** (१)

१)नयनरम्य रंग भरून तिला आकर्षक केले जाते.

२)चिमटीत रांगोळी पावडर पकडून रांगोळी काढली.

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.** (२)

१) महाराष्ट्रात कशाने रांगोळी काढतात?

२) दक्षिण भारतात रांगोळी काढण्यासाठी कशाचा वापर करतात?

**घ) स्व-अध्ययन** (२)

१) तुमच्या मते दिवाळीत येणाऱ्या पाच सणांची (दिवसांची)नावे लिहा

**प्रश्न २-खाली शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** (४)

१)सजावट= २) उपयोगी=

**प्रश्न ३-एक -दोन शब्दात उत्तरे लिहा.** (५)

१)जखमेवर काय लावतात?

२)दिवाळीत कशाला विशेष महत्व असते?

३)रांगोळीचा जन्म कोठे झाला?

४)हळदीचा सन्मान कोठे केला जातो?

५)रांगोळी कुठे काढतात?

**प्रश्न ४- खाली दिलेल्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन )** (४)

१)रांगोळीचा जन्म कोठे व कोणत्या सणांच्या प्रसंगी झाला असे मानले जाते?

२)हळदीचे फायदे लिहा?

३)दिवाळीचा सण कसा साजरा करायला हवा?

### अपठित गद्यांश

**प्रश्न ५-खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

बागेतील झाडावर उरलेले एक टपोरी फुल असते .त्याचा सुगंध सगळीकडे पसरला असतो त्याच्या नाजूक पाकळ्या आणि सुरेख रंग डोळ्यांना सुखातात. हा छोटासा अनुभव पाहताना आपले मन प्रसन्न होऊन जाते. इवल्याश्या फांदीवर डुलणारे ते फुल त्याच दिवशी संध्याकाळी कोमजून जाते, हे खरे पण त्यामुळे त्याचे

Scanned with OKEN Scanner

दिवसभरातील अस्तित्व आणि येणाऱ्या जाणाऱ्यांना त्यांनी दिलेला आनंद या गोष्टीं खोट्या ठरत नाही. आपणही आपले हे छोटेसे जीवन त्या फुलासारखी सुंदर करू शकतो.

**क) रिकाम्या जागा भरा.** (२)

१)______ सगळीकडे पसरला असतो.

२)आपले मन__________ होऊन जाते.

**ख) चूक की बरोबर ते लिहा.** (२)

१)सुरेख रंग डोळ्यांना सुखातात.

२)जीवन त्या फुलासारखी सुंदर करू शकतो नाही.

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.** (२)

१)बागेतील झाडावर काय उमलेली होती?

२) फुलांचा सुगंध कुठे पसरला होता?

## व्याकरण

**प्रश्न६-क) खाली दिलेल्या वाक्यातील विशेषण ओळखा.** (४)

१) अनिता हुशार मुलगी आहे.

२) रोहनकडे पाच टोप्या आहेत.

३) समुद्रात प्रचंड लाटा उसळतात.

४) गुलाबाचे फुल लाल आहे.

**ख) खाली दिलेल्या वाक्यात योग्य विशेषण वापरून वाक्य पूर्ण करा.** (४)

(गोष्टींचे, उंच, सुंदर, पिवळा,)

१) कविता________ चित्र काढते.

२) पक्षी ______ उडाला.

३) रमा _______पुस्तक वाचते.

४) केळीचा रंग_____ आहे.

**ग) खालील विशेषण वापरून वाक्य तयार करा.** (२)

१) आंबट-

२) हिरवा-

## लेखन विभाग

**प्रश्न ७-खाली दिलेल्या निबंधापैकी कोणताही एक निबंध लिहा.** (५)

१) रांगोळीचे महत्त्व.    २) माझा आवडता सण

**किंवा**

**प्रश्न ५- खाली दिलेल्या पत्रापैकी कोणताही एक पत्र लिहा.**

१)तुमच्या मित्राला/ मैत्रिणीला वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे पत्र लिहा.

२)तुम्ही आपल्या आजोबांचा साठावा वाढदिवस साजरा करणार आहात त्याबाबत तुमच्या काकांचा आमंत्रण देणारे पत्र लिहा.

*********************

Scanned with OKEN Scanner